महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग

# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली यांचे कार्यालय

"वन प्रशासकीय भवन", पोटेगांव रोड, गडचिरोली-442605 (महाराष्ट्र)
दुरध्वनी क्र. 07132-233184 Email-ccftgadchiroli@mahaforest.gov.in

क्रमांक कक्ष-3(1)/तेंदू/विक्री/गड/2025-26/ 3723 गडचिरोली, 442605 **दिनांक** :- 17/02/2026
प्रति,

उप वनसंरक्षक,
आलापल्ली/भामरागड/सिरोंचा/गडचिरोली/वडसा, वनविभाग.

**विषय** :- माहे मार्च / 2026 करीता इमारती माल, जळाऊ बिटे व लांब बांबू वनोपजाचे लिलावाचे आयोजन करणेबाबत.

**संदर्भ** :-1) मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपुर यांचे पत्र क्र. कक्ष-1(1)/विक्री/25-26./843 दि. 06.06.2025
2) मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपुर यांचे पत्र क्र. कक्ष-1(1)/विक्री/25-26./965 दि. 23.06.2025

विषयांकित प्रकरणी, चंद्रपूर व गडचिरोली वनवृत्तातील वनोपजाचे लिलावाकरीता एकसुत्रता राहावी व दोन्ही वनवृत्तासाठी जास्तीत जास्त दिवस उपलब्ध व्हावेत या उद्देशाने मुख्य वनसंरक्षक चंद्रपूर वनवृत्त यांनी संदर्भीय पत्र क्र. 1 अन्वये दिनांक 12.06.2025 रोजी व्ही.सी. द्वारे सभा घेवून संदर्भ पत्र क्र. 2 प्रमाणे गडचिरोली व चंद्रपूर वनवृत्ताकरीता लिलाव तारखा निश्चीत केलेल्या आहेत. त्यानुसार गडचिरोली वनवृत्तातील इतर किसम इमारती करीता दिनांक 1 ते 10 व 29, 30/31 तसेच साग इमारती करीता दिनांक 11 ते 19 अशा तारखा मंजुर केलेल्या आहेत.

प्रकरणी, वरीलप्रमाणे मंजुर तारखानुसार माहे मार्च /2026 या महिण्यात इमारती/जलावू मालाचे ई-लिलाव साठी (दिनांक 1, 8, 15, 29 रविवार व 2 होळी, 3 धुलिवंदन, 19 गुडीपाडवा व 31 महाविर जंयती असे शासकिय सुट्टीचे दिवस वगळुन) खालीलप्रमाणे विभागनिहाय लिलाव तारखा आवंटीत करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वनविभाग | इतर किसम इमारती करीता | साग इमारती करीता | जळाऊ बिटे व बांबू करीता | खुला/मैदानी करीता |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वडसा | दि. 10 मार्च चे 15.30 ते 18.30 | दि. 12 मार्च चे 12.40 ते 13.30 | - | - |
| 2 | गडचिरोली | दि. 9 मार्च पुर्ण दिवस | दि. 12 मार्च चे 14.30 ते 18.30 पर्यंत | दि. 12 मार्च चे 14.30 ते 18.30 पर्यंत | - |
| 3 | आलापल्ली | दि. 4 व 30 मार्च पुर्ण दिवस | दि. 16, 17 मार्च पुर्ण दिवस व 18 चे 13.30 पर्यंत | दि. 4, 16, 17, 18 व 30 मार्च पुर्ण दिवस व 18 मार्च पुर्ण दिवस बांबू | दि. 13 व 14 मार्च पुर्ण दिवस |
| 4 | सिरोंचा | दि. 5, 6 व 7 मार्च पुर्ण दिवस | दि. 11 मार्च पुर्ण दिवस व 12 चे 9.00 ते 13.00 पर्यंत | दि. 6, 7, व 11 मार्च पुर्ण दिवस व 11 पुर्ण दिवस बांबू | - |
| 5 | भामरागड | दि. 10 मार्च चे 9.00 ते 15.30 | दि. 18 मार्च चे 14.30 ते 18.30 पर्यंत | - | दि. 14 मार्च 10.00 ते 11.30 पर्यंत |

वरीलप्रमाणे तारखांनुसार आपले वनविभागातील इमारती माल वनोपजाचे ई-लिलावाचे आयोजन करतांना दिनांक 1 एप्रिल/2025 पासुन दररोज सकाळी 9.00 वा. ते सायंकाळी 6.55 वा. पर्यंत प्रति बॅच 6 लॉट याप्रमाणे प्रति दिवस 1070 लॉटस् लिलावात ठेवावयाचे आहेत. तरी लिलाव नियमानुसार लिलाव तारखेच्या 8 दिवसापुर्वी लिलावाकरीता आवश्यक असलेली सर्व माहिती व फोटोग्राफ एनआयसी. समन्वयक, निर्देशन विभाग यांचेकडे सुपूर्द करावे. विहीत वेळेत सदरची माहिती प्राप्त न झाल्यास त्या तारखेचा लिलाव रद्द करण्यात येईल याची नोंद / दक्षता घ्यावी. हि विनंती.

*(मुळ प्रत मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) गडचिरोली यांचेकडून अनुमोदित.)*

**(एस. एन. शेडें)**
विभागीय वन अधिकारी (तेंदू)
गडचिरोली वनवृत्त

**प्रतिलीपी** :- प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) म.रा. नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
**प्रतिलीपी** :- एनआयसी. समन्वयक, निर्देशन विभाग, गडचिरोली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित